साप्ताहिक चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

- वर्ष : १८
- अंक : १३
- पाने : ८

पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com


भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner

- Pioneer in continuous vacuum pans
- Manufacturer & supplier of turn-key boiling house
- Refined sugar plants

For More Details Contact

INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.

WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111. Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.

Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593

Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. १८ ते २४ मे २०२६

संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले


RNI No. MAHMAR/2011/35979

## संपादकीय


घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

# उतरंड अटळ

**ही गोष्ट आहे १९६५ ची! भारत-पाकिस्तान युद्धामुळे मोठी अन्नटंचाई निर्माण झाली होती. त्यावेळी लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे चारित्र्यसंपन्न पंतप्रधान देशाचं नेतृत्व करत होते. त्यांच्या राष्ट्रप्रेमी आणि त्यागी भूमिकेमुळे लोक त्यांच्यावर उदंड प्रेम करत. देशहिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले होते. अन्नटंचाईला सामोरे जाण्यासाठी त्यांनी देशवासीयांना आवाहन केलं की, 'आठवड्यात एक दिवस एका वेळचं जेवण सोडून द्या!' त्यासाठी त्यांनी स्वतः सोमवार निवडला आणि सोमवारी रात्रीचं जेवण वर्ज्य मानलं. त्यांच्या या निर्णयाला देशवासीयांनी उदंड प्रतिसाद दिला आणि असंख्य लोकांनी सोमवारचं जेवण बंद केलं. याचा इतका मोठा परिणाम झाला की, 'सोमवार शास्त्रीजींचा वार' म्हणून ओळखला जाऊ लागला.**



हे आठवण्याचं कारण म्हणजे सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन! युद्धाच्या परिणामुळे तब्बल ७३ दिवसांनी त्यांनी आवाहन केलं की, 'परदेश प्रवास करू नका, सोनं खरेदी करू नका, खाद्यतेलाचा वापर कमी करा, घरातून काम म्हणजे वर्क फ्रॉम होम करा, इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर वाढवून इंधन वाचवा...' हे सगळं सांगायला त्यांना इतके दिवस का गेले याचं उत्तर कोणताही सामान्य माणूस देऊ शकेल. देशातील काही राज्याच्या निवडणुका त्यांच्या डोळ्यासमोर होत्या. 'दीदी... ओ दीदी... खेला होबे...' असं मागच्या वेळी डिवचूनही यश न आल्यानं यंदा पश्चिम बंगालची रणनीती बदलायची होती. आसाम सांभाळायचा होता. हे सगळं झाल्यावर त्यांना देशभक्तीची आठवण येणं स्वाभाविक होतं. मग इंधनवाढ केली गेली. गॅस सिलेंडरचे दर वाढवले. देशभक्तीच्या नावावर सामान्य माणसाचा कणा मोडता येईल, यासाठी जे काही आवश्यक आहे ते करण्यात पंतप्रधानांनी मुळीच कच खाल्ली नाही.



त्यांच्या या आवाहनानंतर काय झालं? देशासमोर जी आर्थिक अणीबाणी येणार आहे त्याची जाणीव सामान्यांना झाली. सराफ मंडळी पंतप्रधानांच्या आणि त्यांच्या पक्षाच्या विरूद्ध गेली. ज्या मायबाप सरकारनं सोन्याच्या आयातीचा कर कमी केला होता त्याच सरकारनं राष्ट्रभक्तीचा आव आणत आवाहन केलं की, 'सोन्याची खरेदी करू नका.' सरकारला विरोध म्हणून कुणी किलानं सोन्याची खरेदी निश्चितच करणार नाही पण यातून असंतोष निर्माण झाला.

जीएसटी, नोटबंदी यातून अजूनही अनेकांना सावरता येत नाहीये. कोविडच्या काळात लस घेणे बंधनकारक करण्यात आले होते. लसीचा डोस घेतला नाही तर बस स्थानक, रेल्वस्थानक, विमानतळ असा कुठेही प्रवेश नव्हता. आता मात्र या लसीचे दुष्परिणाम दिसू लागल्यावर सरकार म्हणतेय आम्ही लोकांच्या सुदृढ आरोग्यासाठी तसे आवाहन केले होते मात्र ते बंधनकारक नव्हते! जीएसटी काय किंवा नोटबंदी काय त्यांच्या या निष्क्रियेतेवर पांघरूण घालण्यासाठी आणि त्याचे निर्लज्ज समर्थन करण्यासाठी काही चित्रपट येत आहेत. आपण जे काही केले ते सगळे राष्ट्रहिताचे होते आणि त्याला जे विरोध करतील ते सर्व राष्ट्रद्रोही असे चित्र निर्माण केले जात आहे.

काँग्रेसच्या अराजकाला कंटाळलेल्या जनतेला बदल हवा होता. त्यासाठी मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडले. आता मात्र आगीतून उठून फुफाट्यात अशीच सामान्य माणसाची गत झालीय. काँग्रेसच्या कारकिर्दीत पिचले गेलेल्या अनेकांना हा देशाचा दुसरा स्वातंत्र्यलढा वाटला. अनेकांना मोदी म्हणजे परमेश्वरी अवतार वाटले. काहींनी त्यांच्यात विश्वगुरू पाहिला. काहींना त्यात भगवान विष्णूचेही दर्शन घडले. मोदींचे भक्त म्हणवून घेण्यात धन्यता वाटावी असा एक मोठा वर्ग तयार झाला. आजची देशाची परिस्थिती पाहता या सगळ्यांच्या भावनांची फसवणूक झालीय असेच चित्र दिसतेय. त्यातल्या अनेकांचा तो अहंकाराचा, प्रतिष्ठेचा विषय असल्याने सहजासहजी ते हे मान्य करणार नाहीत मात्र काळाच्या ओघात

पान ८ वर ▶▶

# 'चपराक'च्या घनश्याम पाटील यांना समाजभूषण पुरस्कार

**पुणे :** सडेतोड पत्रकारिता, वैचारिक लेखन आणि सर्जनशील साहित्यनिर्मितीद्वारे उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल चपराक प्रकाशनचे संचालक आणि प्रकाशक घनश्याम पाटील यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला. बारामती येथील सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले पुस्तक जत्रेत उद्योजक राजेंद्र पवार, युवा नेते आणि विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सतीश खोमणे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र टकले, बापूसाहेब लोखंडे, नवनाथ वळकुंदे, आर. आर. मारकड आदी उपस्थित होते.



यावेळी युगेंद्र पवार म्हणाले, मोरोपंतांपासून बारामतीची साहित्य परंपरा मोठी आहे. 'चपराक'ने अनेक महत्त्वपूर्ण पुस्तकांची निर्मिती करून ती वाचकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत. समाजात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रतिभावंतांचा गौरव केल्यास त्यांचे मनोधैर्य उंचावते. त्यामुळे घनश्याम पाटील यांना हा पुरस्कार देताना बारामतीकर म्हणून मला अभिमान वाटतो. केवळ वाचनाच्या सवयीमुळेच माझे माझ्या आजोबांसोबत खास नाते जुळले. आमच्यासारख्या वाचकांसाठी उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित करून घनश्याम पाटील यांनी आमची दर्जेदार वाचनाची भूक भागविली आहे.

रवींद्र टकले म्हणाले, गेल्या पंचवीस वर्षात घनश्याम पाटील यांनी मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. चपराकच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक विषयांवर निर्भिड भाष्य करत समाजप्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य अव्याहतपणे सुरू ठेवले आहे. प्रतिथयश लेखकांबरोबरच नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देत अनेकांना साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. स्वतः निर्मितीक्षम लेखक असल्याने त्यांनी प्रकाशित केलेल्या साहित्याची विशेष दखल घेतली जाते. त्यामुळे आमच्या संस्थेतर्फे देण्यात येणारा पहिला समाजभूषण पुरस्कार त्यांना देताना आम्हाला आनंद आणि अभिमान वाटतो.

> अनेक वैचारिक मतभेद असूनही गुणवत्तेची दखल घेत पवार कुटुंबीयांनी माझा गौरव केला. यातून त्यांची गुणग्राहकता दिसून येते. साहित्य आणि प्रकाशन क्षेत्रात मी खारीचा वाटा उचललाय. सामाजिक विकास प्रतिष्ठान बारामती यांनी मोठ्या आस्थेने माझ्या या कार्याची दखल घेऊन मला प्रोत्साहन दिले आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे दोनशेवे जयंती वर्ष सुरू असतानाच सावित्रीमाईंच्या नावाने पुस्तक जत्रेचे आयोजन करणे आणि आमच्यासारख्या लोकांची त्यात दखल घेणे हा आमचा मोठा सन्मान आहे. यासाठी आयोजकांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो.
>
> **-घनश्याम पाटील, चपराक प्रकाशन**



प्रल्हाद
दुधाळ
९४२३०१२०२०.



# पुण्यकर्म

निवृत्त होण्यापूर्वी शेवटचे दीड वर्ष मी आमच्या कंपनीच्या जिल्हा प्रशासन विभागाचा अधिकारी म्हणून काम पाहत होतो. इथे काम करताना बरेच आगळे वेगळे अनुभव येत. अशीच एक मनोरंजक पण तेवढीच गंभीरपणे विचार करायला लावणारी एक केस माझ्यासमोर आली होती. इथे काम  करत असताना शक्यतो नियमांची नीटपणे माहिती नसलेल्या आमच्या कर्मचाऱ्यांना होता होईल एवढी मदत करण्याचा माझा प्रयत्न असायचा.

कधी कधी मात्र अशी काही बिलींदर माणसे समोर यायची की ज्याचे नाव ते! निवृत्ती जवळ आलेल्या कर्मचाऱ्यांना बोलावून त्यांचे सर्व्हिस रेकॉर्ड तपासून काही त्रुटी असल्यास त्या दुरूस्त करून पुढे पेंशनसंबंधी काही अडचणी येऊ नयेत यासाठी आम्ही एक मोहीम राबवत होतो. अशाच एका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला तो पुढच्या सहा महिन्यात रिटायर होत असल्याने त्याचे सर्व्हिस बुक दाखवले. सर्व नोंदी त्याला समजावून सांगितल्या.

सर्व्हिस पुस्तकातल्या नोंदी पाहून तो बराच विचारात पडलेला दिसला. त्या दिवशी तो निघून गेला; पण सात-आठ दिवसांनी तो काही कागदपत्रे घेऊन पुन्हा माझ्याकडे आला. येताना त्याने एक अर्ज आणला होता. अर्जात त्याने लिहिले होते...

''माझी पहिली पत्नी राजश्री केशव जाधव, हिचे दिनांक २०मे २००० रोजी निधन झाले. (सोबत मृत्यू प्रमाणपत्र जोडले आहे) त्यानंतर २ जाने. २००१ रोजी मी मुलांची आबाळ होत असल्याने उषा केशव बेंद्रे हिच्याशी लग्न केले आहे आणि या दुसऱ्या पत्नीचे नाव बदलून राजश्री केशव जाधव असे ठेवले आहे! (सोबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदली झाल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे.) माझ्याकडून माझ्या दुसऱ्या लग्नाबद्दल नियमाप्रमाणे कार्यालयाला कळवणे आवश्यक होते पण नजरचुकीने तसे  करणे राहून गेले होते. या चुकीबद्दल मी दिलगीर आहे.

आता याद्वारे मी विनंती करतो की, माझ्या सर्व्हिस पुस्तकात माझ्या पहिल्या पत्नीचे नाव वगळून दुसऱ्या पत्नीची नोंद करावी तसेच माझे आधीचे नामनिर्देशन बदलुन नवीन दिल्याप्रमाणे नोंद करावी...''

त्याचा अर्ज वाचून मी विचारात पडलो. त्याचा अर्ज दाखल करून घेतला आणि त्याला दोन-तीन दिवसात फोन करून कळवतो असे मी सांगितले.

तो अर्ज वाचून मी खूप गोंधळून गेलो होतो. सदर व्यक्तिचे नाव केशव, त्याच्या नव्या पत्नीच्या वडिलांचे नाव केशव, त्याच्या पहिल्या पत्नीचे नाव राजश्री, शिवाय दुसऱ्या पत्नीचे बदललेले नावही राजश्री होते!

त्याची केस मी तपशीलवार वाचायला घेतली...

आता तुम्ही म्हणाल यात विशेष असे काय आहे? सांगतो...

या महाशयांनी दुसरे लग्न २००१ साली केले असे म्हटले; पण त्याची कार्यालयीन नोंदणी मात्र तो सतरा वर्षांनी करत होता! स्वतःच्या ऑफिसला पहिल्या बायकोचे निधन आणि दुसऱ्या लग्नाबद्दल कळवावे असे त्याला तब्बल सतरा वर्षानंतर आवश्यक वाटले! विशेष म्हणजे आपल्या दुसऱ्या बायकोला त्याने पहिल्या बायकोचे नावच दिले!

आहे का नाही योगायोग? सगळी केस वाचून डोक्याचा गोविंदा झाला होता. त्याचे तो बदलू पाहत असलेले नामनिर्देशन वाचले आणि मी गंभीर झालो.

आधीच्या नामनिर्देशनात त्याच्या  पहिल्या पत्नीबरोबर एक मुलगा आणि एका मुलीचेही नाव होते. नवीन नॉमिनेशन पत्रामध्ये मात्र त्याने फक्त दुसऱ्या बायकोचेच नाव लिहिले होते! मुलांची नावे तो काढून टाकत होता!

माझ्या मनात विचार आला, 'काय दोष त्या मुलांचा?'

माझ्या अधिकारात नसूनही मी ती केस पेंडीग ठेवली. विचार करत राहिलो, काय करता येईल? आठवडाभरानंतर तो कर्मचारी पुन्हा आला.

त्याची केस माझ्याकडे पडलेली होती त्यामुळे मी त्याची वाटच बघत होतो. त्याने आपले नामनिर्देशन बदलावे म्हणून दिलेले कागद अजून मी कार्यवाहीसाठी घेतले नव्हते. या केसमध्ये आपण नियमात बसवून काही तरी करायला पाहिजे असे मनापासून वाटत होते पण शेवटी तो त्याचा निर्णय होता आणि ते त्याने कुणाच्या नावाने करावे हा त्याचा अधिकार होता!

तरीही, 'कितीही वाईट असला तरी प्रत्येक माणसात एक सज्जन माणूस दडलेला असतो...' यावर माझा विश्वास होता आणि त्याच्यातल्या त्या सज्जन माणसाला आवाहन करायचे आणि त्या मुलांवर भविष्यकाळात कळत नकळत होणारा अन्याय दूर करायचा मी प्रयत्न करणार होतो.

त्याला नियमांच्या खिंडीत गाठून हे करणे शक्य आहे हे दोन तीन दिवस केलेल्या विचाराअंती मला माहीत झाले होते. आता तो विचार प्रत्यक्षात आणायची वेळ आलेली होती.

''सर माझ्या अर्जाचे काय झाले?''

''ते दुसरे लग्न आणि नॉमिनेशनबद्दल ना...'' मी उगीचच अज्ञान पाजळले.

''हो सर...''

''त्याचे काय आहे की तुमची बायको गेली २००० ला, पुढे २००१ सालात तुम्ही दुसरे लग्न केले बरोबर ना?''

''हो...''

''मग अठरा वर्षांनी तुम्हाला हे ऑफिसला कळवावे असे का वाटले?''

मी माझ्या मनात खदखदत असलेला प्रश्न विचारला...

''हे कळवायला लागतं हे मला माहीत नव्हतं...''

''मग आता कसं काय समजलं?''

''मी या वर्षी रिटायर होणार आहे. त्यामुळे एका नातेवाईकाने सगळं रीतसर करून घ्यायला सांगितलं, म्हणून अर्ज दिलाय...''

''आधी दिलेलं नॉमिनेशन बदलायला त्यानेच सांगितलं का?''

''हो, त्यानेच सांगितलं!''

''तो माणूस दुसऱ्या बायकोच्या नात्यातला आहे ना?''

मी असाच हवेत बाण सोडला.

त्याने आता मान खाली घातली आणि मान डोलावली.

आता माझा आवाज वाढला...

''अरे काय आहे, त्याने सांगितले आणि तुम्ही लगेच अर्ज दिला, थोडं स्वतः डोकं चालवावं वाटलं नाही तुम्हाला? फक्त दुसऱ्या बायकोच्या नावाने नॉमिनेशन हवंय? त्या दोन पोरांनी काय केलंय? त्यांची नावे वगळायची?''

खरं तर त्याच्याशी असं बोलणं नियमानुसार नव्हतं; पण चांगल्या कामासाठी ही रिस्क मी घेतली. माझा तो बदललेला पवित्रा बघून तो बराच गंभीर झाला होता. त्याने काढता पाय घेतला.

''मी दुपारनंतर परत येतो सर...''

माझा निरोप घेऊन तो निघून गेला.

लंचला जाऊन मी परत आलो तर तो माझी वाटच बघत होता.

''सर, ते आधीचे पेपर परत द्या आणि माझे हे नवे नॉमिनेशन घ्या...''

मी त्याचा नवीन अर्ज वाचला आणि मी नकळत माझ्यावर खूश झालो. ऑपरेशन सक्सेसफुल झाले होते!

नव्या नॉमिनेशन फॉर्ममध्ये त्याच्या दुसऱ्या बायकोला ५० टक्के आणि दोन्ही मुलांना २५ टक्के प्रत्येकी असे वाटप केले होते.

''धन्यवाद सर, मी चूक करत होतो. तुम्ही मला सावध केले...''

त्याच्या चेहऱ्यावर वेगळेच समाधान होते. नकळत माझ्या हातून एक पुण्यकर्म होणार होते.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# कोवळी सकाळ : साध्या क्षणांत दडलेले जीवनाचे गहिरे अर्थ




**माधव जोशी,**
डोंबिवली
९२२३४०९१२३

**सातारा येथील ज्येष्ठ लेखक श्रीराम नानल यांनी लिहिलेल्या आणि 'चपराक'ने प्रकाशित केलेल्या 'कोवळी सकाळ' या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी समारंभपूर्वक होत आहे. त्या निमित्त या पुस्तकाला माधव जोशी यांनी लिहिलेली ही प्रस्तावना.**

**काही पुस्तके आपण चाळतो, काही वाचतो पण काही पुस्तके अशी असतात की ती केवळ वाचली जात नाहीत ती आपल्या जगण्यात सामील होतात. 'कोवळी सकाळ' हा श्रीराम नानल यांचा लेखसंग्रह असाच आहे जो वाचताना केवळ माहिती देत नाही तर नकळत आपल्याला स्वतःकडे पाहायला शिकवतो.**

श्रीराम नानल माझा माटुंग्याच्या पोदार कॉलेजमधील (१९६९-७३) वर्गमित्र. कॉलेजनंतर संपर्क कमी झाला पण मैत्रीचा धागा दोन वर्षांपूर्वी परत एकदा जुळला. पोदार कॉलेजमधील मराठी वाङ्मय मंडळ आणि सांगीतिक कार्यक्रमात भाग घेणाऱ्या पन्नास जणांचा आमचा एक 'आदिम' नावाचा व्हाट्सॲप ग्रुप आहे आणि गेली सत्तावीस वर्षे जानेवारीमध्ये आमचे दोन दिवसांचे वार्षिक स्नेहसंमेलन असते. दोन वर्षांपूर्वी मी श्रीरामला या ग्रुपमध्ये सामील करून घेतले. अनेक भुवया उंचावल्या, हा आपल्या कळपाबाहेरचा कोण? श्रीराम कॉलेजमध्ये कार्यक्रमांमध्ये भाग घेत नसे आणि पहिल्या दोन वर्षांनंतर तो नोकरीला लागल्यामुळे सकाळच्या सत्रात गेला. त्यामुळे तो बहुतेकांना माहीत नव्हता. समूहात आल्या आल्या त्याने आमचे वार्षिक संमेलन साताऱ्यात आयोजित केले आणि तो आणि संगीतप्रेमी कलाकार पत्नी उज्वला यांनी त्यांच्या अगत्याने सर्वांना जिंकले. आज फक्त दोन वर्षातच श्रीराम आमच्या समूहातील सर्वात लोकप्रिय 'गुड बॉय' आहे. बँकेत वरिष्ठ व्यवस्थापक म्हणून दीर्घ कारकीर्द पूर्ण करून तो निवृत्त झाला. त्याने बँकेत, विशेषतः ग्रामीण भागात काम केले आणि निवृत्तीनंतरही ग्रामसेवा चालू ठेवली. हजारो माणसे जोडली. साताऱ्यात अग्रणी बँक अधिकारी म्हणून काम करताना त्या-त्या वेळच्या जिल्हाधिकाऱ्यांशी श्रीरामचा संबंध आला. संघाचा कार्यकर्ता म्हणूनही गाजावाजा न करता कार्य चालू आहे. वाचन प्रसारासाठी ग्रामीण भागातील वाचनालयांना पुस्तके स्वतः देणे आणि जमा करून देणे हेही चालू आहे. त्याच्याशी बोलताना प्रथम जाणवते ते त्याचे प्रेम, साधेपणा आणि नवनवीन शिकण्याची आवड. त्याच्यामुळे मी आणि माझी पत्नी सुरेखा साताऱ्यातील डॉ. संदीप व स्वाती श्रोत्री आणि विनोद कुलकर्णी यांच्याशी संपर्कात आलो. श्रीराममुळेच ४५ वर्षांनंतर मी माजी खासदार आणि राज्यपाल श्रीनिवास पाटीलसाहेब यांच्या परत संपर्कात आलो. हे सर्व विस्ताराने सांगण्याचे प्रयोजन हे की या पुस्तकातील श्रीरामचे हे सव्वीस लेख व्यक्तिचित्रात्मक आहेत आणि श्रीरामसारख्या माणसे जोडण्याची हातोटी असणाऱ्या लेखकाने ते लिहिलेले आहेत. यातच पुस्तकाच्या वेगळेपणाबद्दल खातरी मिळते.




'कोवळी सकाळ' हे शीर्षक जितके साधे, तितकेच अर्थगर्भ आहे. हे लेख कोणत्याही ठरवून केलेल्या अभिनिवेशातून जन्मलेले नाहीत; ते मनात सहज उमटलेल्या विचारांचे, अनुभवांचे आणि आठवणींचे स्वाभाविक उमललेले प्रतिबिंब आहेत. सातारा येथील 'दैनिक प्रभात'मध्ये दर बुधवारी प्रसिद्ध होणाऱ्या या लेखांनी वाचकांशी एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले आणि त्या ५२ लेखांपैकी निवडक २६ व्यक्तिचित्रात्मक लेखांचा हा संग्रह त्या संवादाचीच पुढची पायरी आहे. योगायोग असा की प्रभातचे निवासी संपादक श्रीकांत कात्रे यांच्या प्रोत्साहनाने आमच्याच समूहातील माधुरी ताम्हाणे-देव हिने प्रभातसाठी एक वर्ष हे सदर लिहिले आणि तिच्यापासून स्फूर्ती घेऊन त्याआधी मोठे लिखाण न केलेल्या श्रीरामने ते सदर पुढे सुरु ठेवले. या सदरात प्रसिद्ध झालेल्या माधुरीच्या लेखांचे 'टिंबाचा परीघ' हे पुस्तक मार्च २०२६ मध्ये प्रसिद्ध झाले.

या लेखांचे एक वैशिष्ट्य लगेच जाणवते ते म्हणजे त्यांची विषयवैविध्यता. एका बाजूला राज कपूरसारख्या कलाकाराच्या स्मृतिंमधून 'फिर भी दिल है हिंदुस्तानी' या ओळीतून सामान्य माणसाच्या स्वप्नांना आकार देणारा काळ आणि अजोड कलावंताचे चित्र उभे राहते; तर दुसऱ्या बाजूला नारायण सुर्वे यांच्या कवितांमधून कष्टकरी जीवनाचे अस्सल वास्तव समोर येते. कधी दत्तोपंत ठेंगडी यांच्यासारख्या विचारवंताचे कार्य उलगडते तर कधी ॲना फ्रँकची डायरीसारख्या जागतिक साहित्यकृतीतून मानवी आशेचा नाजूक पण अढळ स्वर ऐकू येतो. या विविधतेत एक धागा मात्र सातत्याने जाणवतो तो म्हणजे माणसाकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी...

या साऱ्या लेखनात एक गोष्ट सतत जाणवते ती म्हणजे लेखकाची ही दृष्टी टीकात्मक नाही, उपदेशात्मक नाही; ती समजून घेणारी, आपुलकीची आणि अनेकदा हलक्या विनोदाने उजळलेली आहे. साध्या प्रसंगांतून मानवी स्वभावाचे सूक्ष्म पैलू उलगडण्याची त्याची शैली विशेष लक्षवेधी आहे. हा विनोद कधीही टोकाचा नाही; तो नर्म, नाजूक आणि आपल्यालाच हलकेच आरसा दाखवणारा आहे. पु. ल. देशपांडे यांच्या लेखनातील नाजूक विनोदाची छटा जशी आपल्याला साध्या प्रसंगातही स्वतःचे प्रतिबिंब दाखवते, तशीच काहीशी छटा येथेही जाणवते पण ती नक्कल नसून, लेखकाच्या स्वतःच्या अनुभवातून आलेली स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. या लेखांचे आणखी एक बलस्थान म्हणजे त्यांची भाषा. ती अलंकारिकतेच्या ओझ्याखाली दबलेली नाही; उलट, साधेपणातच तिचे सौंदर्य दडलेले आहे. ही भाषा वाचकासाठी दूरदर्शन देत नाही तर त्याच्या शेजारी बसून संवाद साधते. म्हणूनच हे लेख 'वाचण्यापेक्षा' अधिक 'अनुभवल्यासारखे' वाटतात. जणू एखादा जुना मित्र निवांत गप्पा मारत आहे. लेखक इतिहास, साहित्य, समाजजीवन यासारखे मोठे विषयही सहजतेने हाताळतो. या सर्वांकडे पाहताना त्याच्या लेखनात कोणताही दिखाऊ बौद्धिकपणा दिसत नाही; परंतु विचारांची खोली मात्र स्पष्टपणे जाणवते. हीच सहजता वाचकाला आपलेसे करते. या पुस्तकातील सौंदर्यस्थळे शोधायची झाली तर ती प्रत्येक लेखात वेगवेगळ्या रूपात प्रकट होतात. कधी एखाद्या व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म रेखाटन, कधी एखाद्या प्रसंगातील मानवी भावनांचा हळवा स्पर्श तर कधी एखाद्या साध्या निरीक्षणातून उलगडणारे मोठे सत्य ही सर्व सौंदर्यस्थळे या लेखांना एक वेगळीच उंची देतात. लेखक वाचकाला हात धरून कुठेही नेत नाही; तो फक्त एक दार उघडतो. आत डोकावण्याचे स्वातंत्र्य वाचकावर सोपवतो. या पुस्तकाचा स्वर हा त्याचा सर्वात मोठा गुण आहे. तो कुठलाही दबाव आणणारा किंवा शिकवणी देणारा नाही; तो संवाद साधणारा आहे. शांत, संयत आणि आत्मीय. आजच्या गोंगाटाच्या काळात हा स्वर विशेष महत्त्वाचा वाटतो कारण तो वाचकाला थांबायला, विचार करायला आणि स्वतःशी संवाद साधायला आमंत्रण आणि उसंत देतो.

माझ्यासाठी हे पुस्तक केवळ एक साहित्यकृती नाही; तो एका जुन्या मित्राच्या मनाचा आरसा आहे. अनेक वर्षांनंतर त्याच्या लेखनातून त्याच्याशी पुन्हा संवाद साधल्याचा अनुभव मला आला आणि हेच या पुस्तकाचे खरे यश आहे. लेखकाने जे अनुभवले, ते त्याने प्रामाणिकपणे शब्दांत व्यक्त केले आणि त्या नितळपणातच वाचकाला स्वतःचे प्रतिबिंब सापडते.

'कोवळी सकाळ' हे पुस्तक वाचताना मोठ्या तत्त्वज्ञानाची गरज भासत नाही; कारण ते जीवनातील साध्या क्षणांतच अर्थ शोधायला शिकवते आणि कदाचित हेच त्याचे वैशिष्ट्य आहे. ते आपल्याला सांगते की जीवनातील गूढ अर्थ दूरवर कुठेतरी नसतात; ते आपल्या दैनंदिन अनुभवांतच शांतपणे दडलेले असतात. फक्त त्यांना ओळखण्याची नजर लागते.

श्रीरामला या संवेदनशील, विचारप्रवर्तक आणि मनाला स्पर्शून जाणाऱ्या लेखनासाठी मनःपूर्वक धन्यवाद आणि वाचकांना या पुस्तकाच्या सहवासात काही निवांत क्षण, थोडे हलकेसे हसू आणि काही नवे विचार लाभोत हीच अपेक्षा. या पुस्तकाआधी श्रीरामचे अमेरिका भ्रमंतीवरील पुस्तक एप्रिल अखेरीस प्रसिद्ध झालेले असेल-त्यालाही शुभेच्छा! नुकतेच श्रीरामने अमृतम होत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्याला उदंड आयुष्य मिळो ही शुभेच्छा. सातारा निवासी आणि साताऱ्याच्या सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात मान्यवर असणारे श्रीराम आणि पत्नी उज्वला, पुणे निवासी पुत्र निखील आणि स्नुषा आरती आणि बोस्टन निवासी पुत्र नरेंद्र या प्रेमळ कुटुंबाला आणि या पुस्तकाच्या पुढील भागासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! ■■




वेगवेगळ्या देशांतील संस्कृती, निसर्गसौंदर्य आणि साहसी प्रवासाचे अद्भुत पैलू अत्यंत ओघवत्या आणि प्रभावी भाषेत मांडणारे पुस्तक. जगाच्या सफरीवर नेणारं आणि थरारक अनुभवांची सफर घडवणारं लेखक अनिल दातीर यांचं परदेशातल्या पाऊलखुणा हे एक


**चित्तवेधक प्रवासवर्णन!**

**'जे जे आपण वाचिले, ते ते वर्णावे ऐसे, सहयात्री करोनी सोडावे, सकल वाचक'**
या ओळी सार्थ करणारे त्यांचे लेखन असते. त्याचा प्रत्यय वाचकांना त्यांच्या या पुस्तकात आल्याशिवाय राहणार नाही. मुळात अनिल या नावाचा अर्थच 'वारा' असा. त्यामुळे पायात भिंगरी घेऊन जन्माला आलेल्या अनिलला भविष्यातील भटकंतीसाठी खूप खूप शुभेच्छा आणि त्यांच्या या **'परदेशातल्या पाउलखुणा'** पुस्तकाबद्दल अभिनंदन! या पाऊलखुणा अशाच दुरदूर उमटत जाव्यात आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत आमच्यासारखे वाचक देखील चालत राहोत, ही अपेक्षा.
**- डॉ. संदीप गजानन श्रोत्री, सातारा**

**'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा**
**संपर्क : ७०५७२९२०९२**



चंद्रलेखा बेलसरे-जगताप, पुणे
९८५०८९५०५१





# अनुभूती


**सन १९९१, विवाहापश्चात बहूप्रतीक्षेनंतर मातृत्वाची चाहूल लागली होती. खरं तर विश्वासच बसत नव्हता की आपल्या उदरात अंकुर बहरतोय. मन प्रफुल्लित झालं होतं. दिवसागणिक उत्सुकता वाढत होती. गर्भारपणाचं तेज चेहऱ्यावर विलसत होतं. बाळाची हालचाल जाणवू लागली होती.**

हळूहळू सातवा महिना संपला. डोहाळे जेवणाचा शानदार कार्यक्रम झोकात पार पडला. आई तर दुसऱ्या महिन्यापासून सेवेसाठी हजर होत्याच. शेजारच्या शितोळेकाकी दररोज सकाळी ८ वाजता येऊन गरमागरम बाजरीची भाकरी तूप लावून आणि काऱ्हळाची चटणी समोर बसवून खाऊ घातल्याशिवाय समोरून हलत नव्हत्या. सकाळी सकाळी खाणे जीवावर यायचे पण त्यांचा आग्रह मोडता येत नव्हता. वाटायचं हा कसला नाश्ता? काळी भाकरी आणि काळी चटणी खाऊन बाळ काळे तर होणार नाही ना? अशीही शंका यायची पण त्यांचा प्रेमाचा 'घास भरवणे' तितकेच मनाला आल्हाददायक वाटायचे. मातृत्व न लाभलेल्या त्या माउलीची ही माया कुठेतरी सुखावून जायची. आमच्या घाडगेमावशी सातत्याने डोहाळे पुरावायच्या. इतकेच काय तर गावाकडील आमचे शेजारी, आमचे सरकती आक्काना हे आवडते, ते आवडते म्हणून कधी मासवडी तर कधी शेंगोळे करून त्यांना जसे जमेल तसे शिदोरी पाठवायच्या. आमच्या लहानपणी डेक्कन जिमखान्यावर असलेल्या आमच्या घरी काम करणाऱ्या शारदाबाईंना बातमी कळल्यावर त्या देखील दररोज खाऊ घेऊन यायच्या. ओम शंकर टी हाऊसच्या मालकीण गंगुबाई मैंदर्गी बातमी कळताच दडपे पोहे, बटाटे वडे, सामोसे घेऊन येऊन प्रेमाने खाऊ घालायच्या. ह्या लोकांचे प्रेम, जिव्हाळा पाहून आत्मसंतुष्टी व्हायची.

आता गरोदरपणाचे ओझे पेलवेनासे झाले होते. अवघडलेपण जाणवत होते. लवकरात लवकर आता हे दोन महिने संपावेत आणि बाळाने जन्म घ्यावा, असे वाटू लागले होते.

नवव्या महिन्यात मात्र माझी मनोवृत्ती बदलू लागली. आता हा महिना संपूच नये असे वाटू लागले कारण... कारण त्यानंतर माझ्या बाळाचे माझ्या उदरातील वास्तव्य संपणार होते. ते माझ्यापासून विलग होणार होते, नव्या जगात प्रवेशणार होते आणि नेमके मला ते नको होते. माझं बाळ असंच माझ्या उदरात राहावे, माझ्यापासून विलग होऊ नये असे वाटू लागले होते. आमचं एकमेकांशी असलेले बाँडिंग संपणार होते, एकमेकांशी जुळलेली नाळ तुटणार होती. माझं रक्त, माझी जीवनद्रव्ये आता मला त्याला देता येणार नव्हती. म्हणून बाळाने उदरातून बाहेर येऊच नये, असे मला वाटू लागले होते. ही एका आईची उत्कट इच्छा होती. त्याची अनुभूती फक्त एक आईच घेऊ शकत होती. आपल्या निर्मितीला आपल्यापासून दूर न होऊ देण्याची ही आसक्ती विलक्षण होती. बाळाची उदरातील उपस्थिती मला सुरक्षितता प्रदान करीत होती. त्याची चुळबूळ सुखावत होती. कधी वाटायचं अशी अवस्था सर्वच आयांची होत असावी का? उत्तर मिळत नव्हते पण माझी अवस्था मात्र अशी झाली होती. माहीत नाही माझी ही मनीषा योग्य होती का अयोग्य? पण झाली होती खरी!

एका आईच्या मनःस्थितीची ही कथा ह्या जागतिक मातृदिनाच्या दिवशी नमूद करावीशी वाटली म्हणून हा लेखन प्रपंच! निसर्ग नियमाप्रमाणे मात्र ठरलेल्या वेळेवर बाळाचे आगमन झाले, आपलीच निर्मिती, प्रतिकृती पाहून मन मोहरले, मातृत्व लाभले आणि जीवन परिपूर्ण झाले पण त्या दोन महिन्यातील अंतरद्वंद्व मात्र आगळे-वेगळे होते, याची अनुभूती आजही विसरता येत नाही.



# मधाळ आठवणींची आमराई



मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४

उन्हाच्या झळा अंगाला झोंबू लागल्या की आजही मन गावच्या त्या धुळीने माखलेल्या पायवाटेवर जाऊन पोहोचतं. कोकिळेची ती पहिली आर्त साद कानावर पडली की डोळ्यांसमोर उभी राहते ती गर्द आमराई. रणरणत्या उन्हात अचानक आभाळ काळवंडून यायचं, वळवाचा वारा सुटायचा आणि काळजाचा ठोका क्षणभर चुकायचा. ''पळा रे पाऊस आला!''

आईची ती हाक म्हणजे आमराईतल्या गोड महायुद्धाची नांदीच असायची.

आभाळ भरून आलं की आम्हा पोरांची झुंबड थेट आमराईकडे वळायची. वाऱ्याच्या वेगाने झाडांच्या फांद्या शहारल्या की टप-टप असा मधुर नाद करत पाडाचे आंबे गवतात पडू लागायचे. त्या आवाजासरशी आमची पावलं अधिकच वेगवान व्हायची.

''ए, हा माझा बरं का मी आधी पाहिलाय!'' त्या चिखलात लोळणाऱ्या शेंदरी, रसाळ पाडासाठी चाललेली ती धडपड आणि तो हाती लागल्यावर मिळणारा अफाट आनंद! अहाहा! चिखलाने माखलेल्या हातांनी तो आंबा एखाद्या मौल्यवान रत्नासारखा शर्टाला पुसून फस्त करताना मिळणारा स्वर्गीय आनंद शब्दांच्या पलीकडचा असायचा.


घरातल्या माळ्यावर सुक्या गवताच्या गंजीत आंबे पिकत घालणं हा तर एक कौटुंबिक सोहळाच असायचा. त्या गवताचा उबदार स्पर्श, त्यातून दरवळणारा कैऱ्यांचा मंद सुगंध आणि दिवसागणिक वाढत जाणारी आतुरता  हे सगळं मनात खोलवर साठून आहे. हळूहळू तो अख्खा माळा पिकलेल्या आंब्यांच्या सुवासाने मोहरून जायचा आणि घर जणू अमृतात न्हाऊन निघायचं. ती गावरान चव म्हणजे निसर्गाचं मुक्तहस्त वरदानच होतं.

त्या काळात आमरसाचं आमंत्रण म्हणजे नात्यांची वीण घट्ट करण्याची पर्वणीच असायची. माहेरवाशिणी लेकराबाळांसह कौतुकानं यायच्या. गप्पांच्या मैफिली आणि आठवणींच्या कारंज्यात दिवस कसा निघून जायचा, ते कळायचंही नाही. साधनं कमी होती पण मनांची ओढ मात्र अथांग होती. नात्यांमध्येही त्या गावरान आंब्यासारखाच एक नैसर्गिक गोडवा जपलेला होता.

आज शहरात लखलखीत पेट्यांमधून आंबे घरपोच मिळतात; पण त्या गावरान मातीची ओढ आणि माळ्यावरच्या गवताचा सुगंध कुठेतरी हरवून गेला आहे. तरीही स्मृतींच्या माळ्यावर त्या आठवणींच्या गंजी अजूनही तशाच रचलेल्या आहेत.' ते सोनेरी  दिवस दूर गेले असले, तरी आमराईतला तो वारा, तो पाऊस आणि तो मधाळ गंध आजही मनाला उभारी देतो. जोपर्यंत या आठवणींचा गावरान सुगंध दरवळत राहील, तोपर्यंत ते निरागस बालपण काळजात कायम जिवंत राहील.



# सारथी



डॉ. बी. व्ही. कुलकर्णी
बावधन
९४२२०१०६८२

**कप्तान, संचालक, वाहनचालक (ड्रायव्हर) वगैरे खरं म्हणजे समान अर्थाचे शब्द का समजू नयेत? कदाचित शब्द वेगळे असतील पण त्यांचे अर्थ एकच असतात. 'सारथ्य करतो तो सारथी.' शब्दांचे शोध नक्की कुणी आणि कधी लावले माहिती नाही पण त्यांना दाद दिली पाहिजे. किती विचार करून शब्दांची निर्मिती केली असेल?**

जिथं टीम वर्क असतं तिथंच कॅप्टन असतो. सुसूत्रता आणणे, एखाद्या व्यक्तिमध्ये ज्या विषयात नैपुण्य आहे त्यात त्याला काम करायला भाग पाडणे, त्यातील क्रयशक्तिचा पुरेपूर वापर करून घेणे आणि इप्सित साध्य करणे, अशा प्रकारची जबाबदारी ज्या व्यक्तिवर असते ती प्रमुख म्हणजेच कप्तान असते. काही ठिकाणी टीम वर्क नसतं तरीही इतरांची जबाबदारी त्या व्यक्तिवर असते. उदा. ड्रायव्हर. मग तो रिक्षा, बस, रेल्वे, विमानाचा असो अथवा एखाद्या कंपनीचा, मशिनरीचा, एखाद्या प्रोजेक्टचा असो. बऱ्याचशा खेळात कॅप्टन असतोच. इतरांच्या (बघ्यांच्या) दृष्टिकोनातून त्याला किती महत्त्व असतं हा भाग वेगळा पण वेगळ्या दृष्टिकोनातून बघितलं तर त्याचं महत्त्व अधोरेखित असतंच. साधं बघा ना, क्रिकेट खेळताना सिक्सर मारली, कॅच घेतला, कुणी आऊट झालं तर किती नावं ठेवली जातात? 'एवढं खेळायला कळत नाही?', वगैरे ताशेरे मारले जातात. कृती करताना किंवा निर्णय घेताना वाटतं तितकं सोपं काहीच नसतं आणि दिसतं तसं नसतं म्हणूनच जग फसतं. कोणतंही वाहन चालवत असताना समोरील वस्तुस्थिती, प्रतिकूल परिस्थिती, अडचणी या सर्वांचा विचार करून ड्रायव्हर वाहन ताब्यात ठेवत असतो. काही सेकंदांमध्ये त्याला योग्य त्या वेळी, योग्य ते निर्णय घ्यावे लागतात. त्या निर्णयावर वाहनात असलेल्या सर्व प्रवाशांच्या जीवाची काळजी आणि जबाबदारी त्याच्यावर असते. व्यसन, प्रेमभंग, वैयक्तिक अडचणी, बिघडलेले मानसिक संतुलन, स्वतःच्या आरोग्याच्या अडचणी, कौटुंबिक अडचणी, सामाजिक अथवा आर्थिक अडचणी, नैसर्गिक आपत्ती वगैरे बऱ्याच गोष्टींचा परिणाम हा निर्णय घेणाऱ्यावर होत असतो आणि म्हणूनच शारीरिक आणि मानसिक फिटनेस असं आपण ज्याला म्हणतो तो प्रत्येक व्यक्तिपाशी कोणत्याही कामासाठी असणं अत्यंत आवश्यक असतं.

हे झालं सामाजिक बाबतीत. कुटुंब हे नेहमी चार भिंतीच्या आत असतं. प्रत्येक कुटुंबात कुणीतरी कुटुंबप्रमुख असतो. कुटुंबप्रमुख हाही सारथीच. जुन्या काळी अर्थार्जन फक्त पुरुष करायचे, कुटुंबप्रमुख पुरुष असायचे पण आता काळ बदलला. स्त्री शिकली, समृद्ध झाली, पुरुषाच्या बरोबरीने कमावू लागली. स्त्री-पुरुष हा भेद, स्त्रियांना एक व्यक्ती म्हणून आदर / मान देण्याची मानसिकता जिथं असते तिथं तरी नष्ट होत चालला आहे. प्रमाण कितीही कमी असलं तरी ही वस्तुस्थिती आहे हे मान्य करावंच लागेल. एकत्र कुटुंब असेल तर घरातील इतर सदस्यांना, कुटुंब प्रमुखांनी घेतलेले निर्णय प्रत्येकवेळी योग्य वाटतीलच असं नसतं. प्रेम, आपुलकी, वात्सल्य (बॉण्डिंग) हे सगळ्याच नात्यात महत्त्वाचं असतं. जिथं ही त्रिसूत्री टिकून असते तिथं कुटुंब कितीही मोठं असलं तरी ते एकसंघ असतं, राहतं, टिकतं. इतरांच्या दृष्टीने हेवा वाटावा इतकं समाजिक मान मिळवून राहतं. कुटुंब प्रमुख जेव्हा इतरांच्या बाबतीत निर्णय घेत असतात तेव्हा भविष्याचा विचार करून, चांगलंच घडावं या उद्देशाने घेत असतात. त्या क्षणी ते त्या व्यक्तिला पटले नाहीत, आवडले नाहीत तरी संयम दाखवून ते स्वीकारले जातात. कालांतराने ते निर्णय किती अचूक आणि योग्य होते याची जशी जाणीव होईल तशी कुटुंब प्रमुखांवरील भक्ती, माया, आदर, प्रेम वाढत जाताना दिसतं. जिथं हा संयम कमी पडतो तिथं मतभेद होऊन मिळकतीच्या आणि काही वेळा कुटुंबातील व्यक्तिंच्या पण वाटण्या केल्या जातात आणि काही विद्ध झालेले जीव, जुनं किती छान होतं असं म्हणत पूर्वायुष्याच्या आठवणीवर समाधान मानत राहतात. ज्यांचा कल स्वतंत्र, छोट्या कुटुंबाकडे झुकणारा असतो ते त्याचा लाभ उठवून आपापले स्वतंत्र आयुष्य जगायला मोकळे होऊन जातात. ज्या घरामध्ये पती-पत्नी दोघेही संवेदनशील असतात, एकमेकांचं महत्त्व जाणून असतात तिथं सगळे महत्त्वाचे निर्णय हे एकमेकांशी चर्चा करून, विचारपूर्वक, संगनमतानेच घेतले जातात. त्यांच्यात नेहमी उत्तम संवाद होत असतो. ही वेळ येण्यासाठी त्या दोघांनी एकमेकांना आधी जोखलेले असते. अनुभव घेतलेले असतात. काही काळ निघून गेलेला असतो ज्या काळात घडलेल्या घटना, प्रसंग वगैरेतून काही बोध घेऊन झालेला असतो. ती एक प्रोसेस असते. एकमेकांवर प्रचंड विश्वास असतो. जेव्हा विश्वास डळमळीत होत जातो तसं निर्णय एककल्ली पद्धतीने घेतले जाऊ शकतात. सहनशक्ती संपत आली की वाद उद्भवू शकतात. वाद वाढले की काही ठिकाणी भांडणे विकोपाला जाऊ शकतात. त्यातून घटस्फोट होऊ शकतात. काही जण त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्नही करत असतात. कुटुंब टिकवण्यासाठी, ''तू तुझे निर्णय घे, मी माझे घेत जाईन'', असं फर्मान काढलं जातं. पती-पत्नी म्हणून जगताना आयुष्यातील आनंद कधीच निघून गेलेला असतो पण केवळ तडजोड म्हणून एका घरात एकत्र राहिलं जातं. जगाच्या दृष्टिकोनातून बाह्यतः एक समाधानी कुटुंब असा पोकळ शिक्का मिळवून त्या वृथा आनंदात आपापला अहंकार सांभाळत, रेल्वेच्या ट्रॅकसारखे समांतर आयुष्य जगणं सुरू असतं.

अपेक्षाविरहित नातं पती-पत्नीमध्ये कधीच नसतं आणि ते असूही नये. कथा, कादंबऱ्या, नाटकं, चित्रपट यामध्ये या विषयावर बरीच चर्चा होत आली आहे, आणखीही होत राहील. अवाजवी अपेक्षा नसाव्यात हे खरं आहे पण वाजवी आणि अवाजवी अपेक्षा यामध्ये फार पुसट रेषा असतात. दोघांमधे अंतर फार कमी असतं. म्हटलं तर सापेक्ष. त्या समजून घेण्याची प्रगल्भता दोघांमधे असणं आवश्यक असतं. एकमेकांविषयी असणारा आदर, प्रेम, काळजी, भावी आयुष्यात येणारे कटू प्रसंग /तब्येतीच्या अडचणी यांचा विचार, एकमेकांना आवश्यक तितकं जपणं, कौटुंबिक जबाबदाऱ्यांची जाणीव, असे असंख्य विचार एकमेकांच्या मनात असतात. जिथं वैचारिक समानता नसते तिथं गैरसमजाला सुरुवात होऊ शकते. मग एका पार्टनरने प्रेमाने सुचवलेले उपाय दुसऱ्या पार्टनरला जाचक वाटू शकतात. संयम असेल तर त्यातून नातं तावून सुलाखून टिकून राहतं आणि नसेल तर नात्यातील गोडवा कमी व्हायला सुरुवात होऊ शकते. आपलं आणि आपल्या जोडीदाराचं आयुष्य छान, सुखी आणि आनंदाचं जावं असं सगळ्यांनाच वाटत असतं पण त्यासाठी प्रयत्न दोघांनीही एकाच वेळी करायचे असतात. म्हणजे प्रवास सुरु केल्यानंतर शेवटचा थांबा आधीच माहीत असतो. तरीही तिथंपर्यंत पोहोचण्यासाठी लागणारी मानसिक ताकत, मनाची परिपक्वता, संयम, एकमेकांना कराव्या लागणाऱ्या सूचना, त्यांचं पालन, विश्वास, समजूतदारपणा, काय घ्यायचं-किती घ्यायचं, का घ्यायचं-कसं घ्यायचं, किती टाकायचं, किती टाळायचं-कसं टाळायचं, कसं बोलायचं आणि कुठं शांत राहायचं, अशी सगळी तारेवरची कसरत सारथ्याला करावी लागते. काही वर्षांनंतर फळं मिळायला सुरवात होते. इतरांना वाटतं की किती छान! पण जे त्यातून गेलेले असतात त्यांनाच माहिती असतं की इथंपर्यंत पोहोचण्यासाठी आधी बरंच काही करावं लागतं, कधी एकट्याला, कधी दोघांना तर कधी संपूर्ण कुटुंबाला...!



# चला शोधूया या आनंदाच्या वाटा



अशोक शेटे
संगमनेर
९९२११६९२८६

जगातील प्रत्येक जीवजंतूचा मूलभूत उद्देश एकच आहे, आनंद मिळवणे. प्रत्येक प्राणी आपल्या कुवतीप्रमाणे, निसर्गाने दिलेल्या क्षमतेनुसार आनंद शोधत असतो. मानवाने तर आनंदप्राप्तीचे असंख्य मार्ग शोधून काढले आहेत. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतर मानव आनंदाकडे वळतो. कामात, क्रीडेत तो परम आनंद शोधतो. काही जण मद्याच्या प्रत्येक घोटात तर काही देहाच्या स्पर्शात आनंद पाहतात. त्याने मद्य आणि मदिनेत रममाण होणाऱ्यांचीही संख्या वाढते.

एकदा मित्राबरोबर चर्चा करताना तो म्हणाला, ''अमुक-तमुक चोवीस तास झिंगलेलाच असतो.''


मी सहज उत्तर दिले, ''तो त्याचा आनंद घेतोय.''

तुम्हीही नाही का महिन्यातून एकदा पर्यटनाला जाता, तोही तुमचा आनंदच! मात्र गंमतीचा भाग सोडला तर आनंद घेताना स्वतःला किंवा इतरांना इजा होणार नाही, याची खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. खरा आनंद देण्यात असतो. मग ती विद्या असो, अन्न असो, पैसा असो किंवा सहकार्य. आनंद ही अंतरिक संकल्पना आहे; मात्र आपण तो बाह्य, भौतिक गोष्टींत शोधण्याचा प्रयत्न करतो. जितका भौतिक गोष्टींचा हव्यास वाढतो, तितके आपण आनंदापासून दूर जातो. आनंदी राहायचे असेल तर ईर्षा, द्वेष आणि मत्सर यापासून दूर राहिले पाहिजे.

बुद्ध सभ्यक व्यवहाराचा संदेश देतो. गीता 'निष्काम कर्मयोग' सांगते. कुराण शेजाऱ्यावर प्रेम करण्याची शिकवण देते. येशू ख्रिस्त तर स्वतःला मारणाऱ्यालाही क्षमा करण्याचा संदेश देतो. सर्व धर्मांचा सार एकच, मानवतेतून आनंद. आनंद अशी गोष्ट आहे की ती सर्वांनाच हवी असते; पण तिचे ठरावीक सूत्र कोणाकडेच नसते. खरं तर आनंदाचे गणित प्रत्येकाचे वेगळे असते. लहान मुलाला नवे खेळणे मिळाले की तो जग जिंकल्यासारखा आनंदी होतो. नोकरदाराला महिन्याच्या शेवटी पगार जमा झाल्याचा संदेश आला की त्याचे मन थोडे हलके होते. सकाळच्या गरमागरम चहा आणि वर्तमानपत्रात बरेच आनंद घेतात. कुणाला क्रिकेटची मॅच पाहण्यात रममाण होण्यास आवडते. राजकारण्यांना निवडणुका जिंकण्यात भलता आनंद मिळतो. साध्या गृहिणीला रुचकर स्वयंपाक करण्यात तर खूप आनंद. अशा आनंदाच्या क्षणिक अनेक वाटा आहेत.

माणूस आयुष्यभर काही ना काही मिळवण्याच्या धावपळीत असतो; पण जे आहे त्यात आनंद घ्यायला मात्र विसरतो. सतत 'आणखी थोडं' या अपेक्षेने तो स्वतःलाच दमवतो. अपेक्षा वाढल्या की आनंद आपोआप कमी होतो हे साधे गणित आपणच विसरतो. खरा आनंद मोठ्या गोष्टींमध्ये नसतो; तो लहानसहान क्षणांत दडलेला असतो. आवडीचे पुस्तक वाचणे, मित्राबरोबर गप्पा मारत फिरणे, एखाद्याचे मनापासून कौतुक करणे, कुणाला अडचणीत मदत करणे, आपल्या कृतीमुळे कुणाच्या चेहऱ्यावर हास्य उमटणे या गोष्टी खोल समाधान देतात. काही आपल्या दैनंदिन कामात आनंद शोधतात ते तर फारच छान.

नेहमी कृतज्ञ राहावे. तुलना, ईर्षा आणि असमाधान थोडे बाजूला ठेवावे. त्यामुळे मन हलके होते; आणि मन हलके झाले की आनंद आपोआप जवळ येतो. मोठी स्वप्ने पाहण्याआधी छोटे क्षण जगायला शिका. आयुष्य म्हणजे मोठ्या यशांची माळ नाही तर लहान-लहान आनंदांची सुंदर गुंफण आहे. जपानी इकिगाई सांगते, तुमच्या जगण्याचा उद्देश शोधा व त्यासाठी निखळ साधे जागा. कष्टाने शारीरिक आरोग्य जपण्याचाही एक वेगळाच आनंद असतो. श्रमातून आलेले यश, नात्यांतील विश्वास आणि स्वतःशी प्रामाणिकपणा यांची किंमत वेळेसोबत वाढत जाते. म्हणूनच आनंदाचे गणित 'मिळवण्याचे' नाही तर 'जपण्याचे' आहे. रोजच्या छोट्या निर्णयांची बेरीज, चुकीतून घेतलेल्या शिकवणीची वजाबाकी आणि संयमाने केलेल्या भागाकारातूनच आनंदाचे गणित सुटते. स्वतःशी शांत, इतरांशी सौम्य आणि आयुष्याशी कृतज्ञ राहिलो तर आनंद आपोआप संतुलित राहतो. हे सर्व करण्याची शक्ती निखळ, निरपेक्ष प्रेमभाव दयाभाव देतो. प्रेम, दया हेच या जगातील आनंदाचे शाश्वत मूल्य आहे. चला तर मग, एकमेकांवर प्रेम करूया... थोडे दयाळू होऊ या... आनंदाच्या वाटा शोधूया... सुरुवात तर करून पाहू. बघू या, जमतंय की नाही!





मयूर बागुल
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

लघुकथा

# शहर विरुद्ध गाव

विराजचं गाव होतं पानवडी. लहानसं, शांत, हिरव्या डोंगरांच्या कुशीत विसावलेलं. सकाळी कोंबड्यांच्या आरवण्याने दिवस सुरू व्हायचा आणि रात्री चांदण्यांच्या प्रकाशात संपायचा. गावातले सगळे एकमेकांना ओळखणारे, एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणारे. विराजला हे सगळं आवडायचं पण त्याच्या मनात एक वेगळीच ओढ होती शहराची. त्याला वाटायचं, शहर म्हणजे स्वप्नांची जागा. उंच इमारती, मोठे रस्ते, चमकणारे दिवे आणि भरपूर संधी. त्याचे वडील शेतकरी होते. त्यांनी आयुष्यभर मातीशी नातं जोडलं होतं.

एक दिवस विराज म्हणाला, ''बाबा, मला शहरात जायचंय. काही तरी मोठं करायचंय.''

वडिलांनी शांतपणे विचारलं, ''मोठं म्हणजे काय रे?'' विराज म्हणाला, ''इथं काही नाही बाबा! शहरातच भविष्य आहे.'' त्या दिवशी पहिल्यांदाच वडिलांच्या चेहऱ्यावर हलकीशी वेदना उमटली तरीही त्यांनी त्याला थांबवलं नाही. ''जा पण गाव विसरू नकोस.'' विराज शहरात आला. पुण्यात पहिल्या दिवशीच त्याला शहराची गती जाणवली. लोक धावत होते. रस्ते धावत होते. वेळ धावत होती. इथे कोणी थांबत नव्हतं. सुरुवातीला सगळं रोमांचक वाटलं. मोठ्या इमारती, मॉल, कॅफे, ऑफिसेस जणू स्वप्न साकार झालं होतं. त्याने एका कंपनीत नोकरी मिळवली. पहिल्या महिन्याचा पगार हातात घेताना त्याला वाटलं मी जिंकलो पण हळूहळू त्याला शहराचा दुसरा चेहरा दिसू लागला. इथे शेजाऱ्याला ओळखायला वेळ नव्हता. इथे कोणी कोणाचं नव्हतं. गावात एखाद्याच्या घरी दुःख आलं की संपूर्ण गाव उभं राहायचं. इथे दुःखही एकटंच असायचं. एका दिवशी तो आजारी पडला. गावात असता तर आईने काढलेला काढा, वडिलांची काळजी, शेजाऱ्यांची विचारपूस मिळाली असती. इथे मात्र त्याला स्वतःच डॉक्टरकडे जावं लागलं. त्या दिवशी त्याला जाणवलं शहरात सुविधा आहेत पण माणुसकी कमी आहे. दरम्यान, गावातही बदल सुरू झाले होते. पाऊस कमी झाला होता. शेतीचं उत्पादन घटलं होतं. विराजचे वडील चिंतेत होते. एकदा फोनवर वडील म्हणाले, ''शेती आता तितकी सोपी राहिली नाही.''

विराज म्हणाला, ''मग सोडा ना शेती.''

वडील हसले. 'शेती सोडली तर आपण कोण?' त्या प्रश्नाचं उत्तर विराजकडे नव्हतं. शहरात त्याचं आयुष्य वेगानं पुढे जात होतं पण आत कुठेतरी रिकामेपण वाढत होतं. एकदा कंपनीत मोठा प्रोजेक्ट आला. त्यासाठी रात्री जागून काम करावं लागलं. तो खिडकीतून बाहेर पाहत होता. हजारो दिवे चमकत होते पण त्या प्रकाशातही अंधार जाणवत होता. त्याला गावाची आठवण आली. जिथं वीज नसतानाही माणसांच्या चेहऱ्यावर प्रकाश असायचा. दरम्यान, गावात त्याचा मित्र सचिन शेतीत नवीन प्रयोग करत होता. त्याने ड्रिप इरिगेशन बसवलं, नवीन पिकं घेतली. गावात हळूहळू बदल होत होते. एकदा विराज सुट्टीत गावात गेला. त्याने पाहिलं गाव पूर्वीसारखं शांत होतं पण आता ते बदलत होतं. सचिन म्हणाला, ''तू शहरात गेलास पण आम्ही गाव बदलतोय.'' विराज आश्चर्यचकित झाला. त्याने पाहिलं शेतीत नवीन तंत्रज्ञान, सोलर पॅनल, पाणी साठवण व्यवस्था! गाव मागे नव्हतं राहिलं. त्या रात्री तो वडिलांसोबत शेतात बसला होता. चांदणं पसरलं होतं. वडील म्हणाले, ''शहरात काय मिळालं?'' विराज काही क्षण शांत राहिला. मग म्हणाला, ''संधी मिळाल्या पण माणसं हरवली.'' वडील म्हणाले, ''इथे माणसं आहेत पण संधी कमी आहेत.'' त्या एका वाक्यात शहर आणि गावाचा संघर्ष दडला होता. पुढच्या काही दिवसांत विराजने गाव नीट पाहिलं. इथे साधेपणा होता पण इथे भविष्यही होतं. फक्त योग्य मार्गदर्शन हवं होतं. तो परत शहरात गेला पण यावेळी त्याच्या मनात वेगळं स्वप्न होतं. काही महिन्यांनी तो कायमचा गावात परतला. सगळे आश्चर्यचकित झाले. तो म्हणाला, ''शहराची गती आणि गावाची माती दोन्ही एकत्र आणायची आहेत.'' त्याने गावात एक छोटं ॲग्री-स्टार्टअप सुरू केलं. शेतकऱ्यांना बाजाराशी जोडण्याचं काम सुरू केलं. ऑनलाइन विक्री, आधुनिक शेती, प्रशिक्षण गाव बदलू लागलं. हळूहळू शहरातील काही तरुणही गावाकडे वळू लागले. गाव आणि शहर यांच्यातली दरी कमी होऊ लागली. विराजला आता कळलं होतं संघर्ष 'शहर विरुद्ध गाव' असा नसतो. तो विचारांचा असतो. शहर संधी देतं, गाव ओळख देतं. शहर वेग देतं, गाव स्थैर्य देतं. दोघांपैकी एक निवडण्याची गरज नसते. दोघांना जोडण्याची गरज असते. आज पानवडी बदललं आहे. ते पूर्ण शहर झालं नाही आणि गावही राहिलं नाही. ते एक नवीन जग बनलं आहे जिथं शहराची प्रगती आणि गावाची माणुसकी एकत्र नांदते. विराज आता समाधानी आहे कारण त्याने शहर जिंकलं नाही आणि गावही सोडलं नाही. त्याने दोघांना जोडण्याचा मार्ग निवडला आणि कदाचित खरी प्रगती तिथेच दडलेली आहे.

# संवादातलं जिवंत शिक्षण



भरत विठ्ठल पाटील
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

मज आवडते मनापासूनी शाळा

वर्गात शिकवताना कधी कधी असा क्षण येतो जेव्हा पाठ्यपुस्तक बाजूला राहते आणि आयुष्यच धडा बनून उभं राहतं. अशाच एका दिवशी मी माझ्या आयुष्यातील 'धस' या प्रसंगाचा उल्लेख करत होतो. आम्हनं धाकलपन या अहिराणी सदरातील माझ्या शिकवत असलेल्या प्रसंगाला अनुसरून लहानपणी शेतात कामाला गेल्यावर भर दुपारी अनवानी पायात खोलवर घुसलेलं धस, त्यातून वाहणारे रक्त आणि तरीही थांबता न येणारी कामाची घाई हे मुलांना सांगताना मन भरून येत होतं. पोरं जीवापासून ऐकत होती. यावेळी शब्दांपेक्षा त्या वेदनेची जाणीवच अधिक बोलत होती. मुलं शांत होती; पण ती केवळ ऐकत नव्हती तर त्या प्रसंगात स्वतःला कुठेतरी पाहत होती हे जाणवत होतं. वर्गातील श्रावणीने हळूच मला थांबवत हात वर केला. ती म्हणाली, ''सर, माझ्या पप्पांच्या पायात पण असंच काहीतरी घुसलं होतं. खूप दुखत होतं. आई म्हणाली होती, 'आज जाऊ नका शेतात' पण पप्पा म्हणाले, 'कांद्याला पाणी नाही दिलं तर पीक जळेल.' ते लंगडत-लंगडत शेतात गेले. त्यांना खूप जबर लागलं होतं, त्यांचा चेहरा बघवत नव्हता पण ते थांबले नाहीत.''

श्रावणीच्या डोळ्यांत काळजी होती आणि वडिलांबद्दलचा अभिमानही होता. त्या क्षणी तिने केवळ एक घटना सांगितली नाही तर कष्ट, जबाबदारी आणि कुटुंबासाठी झगडणाऱ्या माणसाचं चित्र उभं केलं. तिचं हे समजणं आकलना पलीकडे होतं. गप्पांच्या ओघात थोड्याच वेळात मानसीनेही तिचा अनुभव मांडला. ती म्हणाली, ''सर, माझ्या पप्पांना कधी कधी खूप ताप येतो. तरी ते गाडी घेऊन सुरतला जातात. मी म्हणते, 'आज जाऊ नका', तर ते हसून म्हणतात, 'तुम्ही शिकत राहा, बाकी मी बघतो.' ते परत येतात तेव्हा खूप थकलेले असतात पण आमच्यासाठी ते कधीच नाही म्हणत नाहीत. आम्ही त्यांची वाट पाहतो.'' मानसीच्या आवाजात एक वेगळीच भावना होती. वडिलांच्या कष्टांची जाणीव आणि त्यांच्या पाठिंब्यामुळे निर्माण झालेली सुरक्षितता.

वर्गातील असा जिवंत संवाद हा केवळ बोलणं ऐकणं एवढ्यावर मर्यादित राहत नाही तर तो शिक्षणाच्या प्रक्रियेला अर्थपूर्ण आणि परिणामकारक बनवतो. जेव्हा मुलांना त्यांच्या अनुभवांबद्दल मोकळेपणाने बोलण्याची संधी मिळते तेव्हा ते केवळ माहिती ग्रहण करत नाहीत तर त्या ज्ञानाशी भावनिक नातं जोडतात. बालमानसशास्त्रानुसार, अशी अभिव्यक्ती मुलांच्या आत्मविश्वासाला चालना देते, त्यांच्या विचारांना दिशा देते आणि शिकण्याची अंतर्गत प्रेरणा वाढवते.

संवादातून शिक्षकाला प्रत्येक मुलाच्या पार्श्वभूमीची, कुटुंबातील परिस्थितीची आणि त्यांच्या भावविश्वाची जाणीव होते. त्यामुळे अध्यापन अधिक संवेदनशील आणि वास्तवाशी जोडलेलं करता येतं. उदाहरणार्थ, श्रावणी आणि मानसी यांच्या अनुभवातून शिक्षकाला त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, पालकांचा त्याग आणि त्या अनुषंगाने त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या भावना समजतात. या जाणिवेवर आधारित शिक्षण मुलांना अधिक जवळचं वाटतं. म्हणूनच, संवाद हा शिक्षणाचा केवळ एक भाग नसून, तो शिक्षणाला जिवंतपणा देणारा आत्मा आहे. जिथे संवाद असतो, तिथे समज निर्माण होते; आणि जिथे समज निर्माण होते, तिथेच खऱ्या अर्थाने शिक्षण घडतं.

अशा प्रसंगांमधून मुलांना केवळ शैक्षणिक ज्ञान मिळत नाही तर जीवन समजून घेण्याची दृष्टी मिळते. कष्टाचं महत्त्व, जबाबदारीची जाणीव आणि कुटुंबासाठी केलेला त्याग यांची मूल्यं त्यांच्या मनात नकळत रुजतात. श्रावणी आणि मानसी यांच्या अनुभवातून मुलांना हे उमगते की, अडचणी आल्या तरी कर्तव्यापासून पळ काढायचा नसतो, तसेच शिक्षण हीच पुढे जाण्याची खरी ताकद आहे.


यासोबतच अशा संवादातून अनेक जीवनकौशल्यांची जडणघडण होते. स्वतःचे विचार मांडण्याची क्षमता, इतरांच्या भावनांची जाण ठेवण्याची संवेदनशीलता, परिस्थिती समजून निर्णय घेण्याची क्षमता आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची वृत्ती ही सर्व कौशल्ये मुलांमध्ये विकसित होतात. मुलं एकमेकांचे अनुभव ऐकून सहानुभूती शिकतात आणि जीवनातील वास्तव स्वीकारण्याची मानसिक ताकद मिळवतात. म्हणूनच असे अनुभवाधारित संवाद हे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात कारण इथे केवळ विद्यार्थी घडत नाहीत तर संवेदनशील आणि जबाबदार माणूस घडत असतो. या दोन्ही वास्तव प्रसंगांनी वर्गातील वातावरण पूर्णपणे बदलून टाकलं. इथे शिक्षण म्हणजे केवळ माहिती देणं नव्हतं; तर जीवन समजून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. बाल मानसशास्त्राच्या दृष्टीने पाहिलं तर अशा प्रसंगांमध्ये मुलं त्यांच्या भावविश्वातून व्यक्त होतात. त्यांना जे दिसतं, जे जाणवतं, ते ते शब्दांत मांडतात. ही अभिव्यक्ती त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देते. मुलांच्या मनात आधीपासूनच निरीक्षणाची ताकद असते. ते आपल्या आजूबाजूच्या प्रत्येक कृतीकडे लक्ष देतात आणि त्यातून अर्थ काढतात. शिक्षक म्हणून आपण फक्त योग्य संधी निर्माण केली तर ही निरीक्षणं सहजपणे बाहेर येतात. अशा संवादातून मुलांमध्ये सहानुभूती, कृतज्ञता आणि जीवनमूल्यांची जाणीव विकसित होते. या अनुभवाने पुन्हा एकदा जाणवलं की, वर्ग म्हणजे चार भिंतींच्या आत घडणारी प्रक्रिया नसून, तो प्रत्येकाच्या आयुष्याशी जोडलेला प्रवास आहे. मुलांच्या अनुभवांना ऐकून घेतलं, त्यांना व्यक्त होऊ दिलं तर शिक्षण अधिक जिवंत आणि अर्थपूर्ण बनतं. शेवटी इतकंच जाणवतं अशा संवादांतून उलगडणारे अनुभव, त्यातून रुजणारी मूल्यं आणि घडणारी कौशल्यं हीच खरी शिक्षणाची पायाभरणी असते. पुस्तकातील धडे कधीतरी विसरले जाऊ शकतात; पण मनाला स्पर्श करणारे हे अनुभव आयुष्यभर सोबत राहतात आणि मुलांना सक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनवतात.

# अखेर धनवानही निर्धनच





संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०



ओशोंच्या **कथा**

**माणसांचे जीवन जे आहे, ते नेमके कशासाठी आहे? प्रत्येकालाच जीवनात आनंद हवा आहे. तो मिळवण्याचा नेमका मार्ग कोणता आहे? माणूस जीवनभर धावपळ करत आहे. त्या धावपळीत काही मिळवण्यासाठी केवढा तरी अट्टहास करत आहे. त्या साऱ्या प्रवासात माणसाला खरंच समाधान, सुख, मिळते का? आपल्याला हवी असलेली संपत्ती आपल्याला खरंच आनंद देते का? जीवनात हवं असलेलं सारं मिळालं तरी जीवन सुखी होत नाही. पैसा, संपत्ती, धन, दौलत म्हणजे सुख नाही मात्र हे जेव्हा कळते तेव्हा आयुष्यातील बराच वेळ गेलेला असतो. जीवनभर धावपळ केल्यानंतरच संपत्ती मिळते आणि ती जेव्हा मिळते तेव्हा त्यात आनंद नाही हे लक्षात येते. आपण धनवान असूनही जीवनानंदाला पारखे झालेलो असतो तेव्हा एका अर्थाने आपण निर्धनच असतो. लोक ज्याला धनवान समजतात, ती माणसं प्रत्यक्षात मात्र निर्धनच असतात. खरं तर प्रत्येकाची श्रीमंतीची कल्पना भिन्न असते. त्या प्रवासात त्याने कितीतरी अट्टहास करून धन मिळवले तरी जीवनानंदाचा प्रवास सुरू होत नाही. भगवान ओशो यांनी त्या संदर्भाने एक गोष्ट सांगितली आहे.**

ते सांगतात की, ''एका कोट्यधीशाच्या घरी मी एकदा राहिलो होतो. कोट्यधीशच होता तो. त्यांच्याजवळ नाही असं काहीच नव्हतं परंतु त्याचे डोळे निर्धन होते. त्यांच्याकडे पाहून त्यांची दया येत होती. रात्रंदिवस तो धन-दौलत गोळा करीत असायचा. दिवसभर पैसे मोजणे, सांभाळणे आणि त्यांचे रक्षण करणे हाच त्याचा जीवनप्रवास ठरला होता. इतक्या पैशाचा मालक आहे असे त्याला वाटायचे पण तो काही धनी नव्हता, तो फक्त रखवालदार होता. दिवसभर तो फक्त धन साठवण्याचा विचार करायचा. त्यामुळे रक्षणाचा विचार मनात असायचा. तो रात्रीही रक्षण करण्याचा विचार करायचा. धनाचा राखणदार कधीच झोपू शकत नाही हे खरेच. स्वप्नशून्य निद्रा ही संपत्ती फक्त त्यांनाच लाभते, जे सर्व तऱ्हेच्या संपत्तीच्या विकृतीतून मुक्त होतात. धन, यश किंवा धर्म ज्या कशामागेही ज्याचे धावणे आहे, त्याचे दिवस-रात्र अशांत असतात. जेथे चित्त स्थिरावते, तिथेच शांती निर्माण होते.


त्या रात्री मी झोपण्यापूर्वी खऱ्या अर्थाने कफल्लक असलेल्या आणि बाह्यांगाने करोडपती असणाऱ्याचा मी निरोप घेऊ लागलो. तेव्हा तो करोडपती म्हणाला, ''मलाही झोपण्याची फार इच्छा आहे परंतु निद्रादेवी माझ्याकडे येतच नाही. सारी रात्र या धनाची काळजी करण्यातच संपून जाते. कितीतरी भयंकर विचार डोक्यात थैमान घालत असतात. अनेक तऱ्हेची भीती भेडसावत असते. स्वस्थ आणि शांत झोप मला कशी मिळेल याचा एखादा मार्ग मला सांगा,'' अशी त्यांनी विनंती केली. ''मी काय करू? वेडं व्हायची वेळ आली आहे...''

त्याच्या या प्रश्नाला माझ्याकडे तसे कोणतेचे उत्तर नव्हते. त्यांचा रोग मला माहिती आहे की, धन हाच त्यांचा रोग होता. रात्र-दिवस ह्या धन रोगाने त्याला ग्रासले होते. स्वतःच्या बाहेर कोणत्याही सुरक्षिततेचा शोध हाच मूळ रोग असतो. या शोधामुळे सुरक्षितता तर प्राप्त होत नाहीच उलट रोग अधिकच बळावत जात असतो. सुरक्षिततेचे सारे उपाय सोडून जोपर्यंत व्यक्ती स्वतःपर्यंत परतत नाही, अंतर्मुख होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तिचे सबंध जीवन एक दीर्घ, दुःखमय स्वप्नच बनून राहत असते. खरं म्हणजे सुरक्षा स्वतःशिवाय दुसरी कोठेच नाही परंतु ती मिळविण्यासाठी सर्व प्रकारे असुरक्षित होण्याचे साहस पाहिजे. मी त्यांना एक गोष्ट सांगितली आणि म्हटले, ''जा, झोपी जा!'' आश्चर्य असे की मी म्हटल्यावर त्यांना झोप लागली. दुसऱ्या दिवशी त्यांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे आणि आनंदाचे अश्रू उभे राहिले होते. त्याचा विचार करतो तेव्हा माझा माझ्यावरच विश्वास बसत नाही. कदाचित मनाच्या एखाद्या विशेष अवस्थेत एखादी साधारण गोष्टही कधी असाधारण ठरते. कदाचित सहजपणे तीर अगदी योग्य ठिकाणी लागला होता. त्या रात्री ते झोपी गेले होते, हे झालंच. नंतर देखील त्यांच्या जीवनात आणखी फुलं फुलू लागली. अशी कोणती गोष्ट मी सांगितली होती बरं? साहजिकच ती जाणून घेण्याची जिज्ञासा तुमच्या डोळ्यात तीव्र झाली आहे.''

ओशो म्हणतात की, एक महानगर होते. या नगरात एका भिक्षुचे आगमन झाले. असे अनेक भिक्षू त्या नगरीत येत असत परंतु या भिक्षुच्या अंगी काही अद्भुत गुण होते. हजारो लोकांची रांग त्याच्या झोपडीकडे लागलेली होती. भिक्षुला भेटून येणारा माणूस पहाडातील निर्झराशी, अरण्यातील गहन शांततेत किंवा आकाशातील ताऱ्याशी एकात्म झाल्यावर जो स्वर्गीय सुगंध आणि तेज पसरेले आहे असा अनुभव घेत असायचा. या भिक्षुचे नावही अजब होते - कोटिकर्ण श्रोण. संन्यास घेण्यापूर्वी तो मोठा धनिक माणूस होता. त्याच्याकडे एक कोटी किंमतीची कुंडले तो कानात घालीत असे, म्हणून त्याचे नाव पडले होते कोटिकर्ण. त्याच्याजवळ अपार धनसंचय होता परंतु एवढ्या धनसंचयानंतर देखील स्वतःच्या अंतर्यामीची निर्धनता दूर होत नव्हती. मग त्याने धनाचा त्याग केला. एका अर्थाने तो निर्धनी बनला होता मात्र त्याचवेळी तो खरा धनी बनला होता. हीच घटना तो लोकांना सांगत असे. त्याच्या श्वासाश्वासातून गुंजणारं संगीत, त्याच्या नेत्रातून झरणारी शांती, त्याच्या शब्दातून आणि मौनातून प्रगट होणारा आनंद हे सारे त्याच्या जीवनानंदाचे पुरावेच होते. मन प्रौढ बनले की धनदौलत, यश, अधिकारपद, महत्त्वाकांक्षा या साऱ्यापासून सहजपणे मुक्ती होते. भिक्षू श्रोणला पाहण्यासाठी, त्याचं प्रवचन ऐकण्यासाठी, गावाबाहेर हजारो लोकांचा समुदाय जमला होता. निर्वात ठिकाणी जळणाऱ्या दिव्याची ज्योत शांत, स्थिर असावी त्याप्रमाणे भिक्षू श्रोणचे भाषण ऐकणाऱ्या त्या समुदयाचे चित्त एकाग्र, शांत झालेले होते. या समूहात कातियानी नावाची एक श्राविकाही होती. संध्याकाळ झाली तशी कातियानी दासीला म्हणाली, '' तू जा आणि दिवा लावून ये. मी तर हा अमृतासारखा गोड उपदेश सोडून उठणार नाही.''

दासी घरी पोचली. पाहते तो घराला चोरांनी मोठं भगदाड पाडलेले होते. आत चोर सामानाची लुटालूट करीत होते. बाहेर चोरांचा सरदार पहारा करीत उभा होता. त्याच पावली दासी परतली. चोराच्या नेत्यांनी तिचा पाठलाग केला. दासी कातियानीपाशी जाऊन घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, ''मालकीणबाई, घरात चोर शिरले आहेत...'' परंतु कातियानीने तिकडे अजिबातच लक्ष दिले नाही. तिचे चित्त निराळ्याच विषयात गुंतलेले होते. ती तर जे ऐकत होती ते ऐकतच राहिली. जे पाहत होती ते पाहत राहिली. ती जेथे होती तेथेच बसून होती. ती कोण्या वेगळ्याच जगात होती. तिच्या नेत्रातून आनंदाश्रू वाहत होते. दासीने घाबरून तिला हलविले आणि सांगितले, ''मां, चोरांनी घराला भगदाड पाडले आहे. सारे सोन्याचे दागदागिने ते नेत आहेत.''

कातियानीने डोळे उघडले आणि म्हटले, ''वेडे! चिंता करू नकोस, त्यांना जे न्यायचे आहे ते नेऊ देत. ते सोन्याचे दागिने सर्व नकली आहेत. मी अज्ञानात होते म्हणून ते खरे होते. ज्या दिवशी चोरांचे डोळे उघडतील, तेव्हा त्यांच्याही लक्षात येईल, की ती सुवर्णभूषणे नकली आहेत. खोटी आहेत. डोळे उघडल्यावर जे सुवर्णधन प्राप्त होते, ते कधी कुणाला चोरता येत नाही, की बळजबरीने हिसकावून घेता येत नाही. ते सुवर्ण मी आता प्रत्यक्ष पाहत आहे. ते सुवर्ण तर माझ्या अंतर्यामीच आहे.'' मालकिणीच्या बोलण्याचा अर्थ दासीला समजला नाही. ती हतबल होत, अवाक झाली. तिला वाटले या मालकिणीला झालंय तरी काय? परंतु मालकिणीचं ते बोलणं ऐकून चोराच्या सरदाराच्या हृदयाच्या तारा छेडल्या गेल्या, झंकारल्या. जणू त्याच्या अंतःकरणातलं बंद दार उघडलं गेलं. आतापर्यंत अप्रकाशितच राहिलेली एक ज्योत त्याच्या आत्म्यात पेटली. तो परतला आणि आपल्या साथीदारांना म्हणाला, ''मित्रांनो, गाठोडी इथंच सोडून द्या. हे सुवर्णालंकार सारे नकली आहेत. त्या ज्या स्वर्गीय संपदेमुळे मालकिणीला ही सुवर्ण भूषणंही खोटी वाटली, त्या संपदेचा आपणही शोध करू या. ती दिव्य स्वर्णराशी मला देखील दिसते आहे. ती काही दूर नाही. अगदी जवळच आहे. ती स्वतःतच आहे. आपल्याही जीवनाची हिच स्थिती आहे. आपण नेमके काय करतो आहोत याचा शोध जीवन प्रवासात घेतला तर जीवनाला आनंदाचे भरते आल्याशिवाय राहणार नाही.




## पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रातील विविध भागांत प्रयोगशील उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांच्या कथा.
- शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक.
- शिक्षणप्रेमी, शिक्षक, पालक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी एक अनिवार्य वाचन.
- शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा लेखाजोखा.

महाराष्ट्राला शिक्षकांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. खेड्यापाड्यांमध्ये अनेक शिक्षक आपल्या नावीन्यपूर्ण योगदानाने शिक्षण प्रक्रियेत योगदान देत आहेत. २०२५ या वर्षात दैनिक ॲग्रोवन वृत्तपत्राकडून पुन्हा एकदा मला लेख लिहिण्याची संधी मिळाली. ही संधी महाराष्ट्रातील उपक्रमशील शिक्षकांच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी कारणी लावावी असे माझ्या मनाने घेतले. मी स्वतः शिक्षक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ काम केलेले असल्याने अनेक चांगल्या शिक्षकांबद्दल मला पाहून, वाचून माहिती होते. 'चांगली माणसे मोजण्यासाठी हाताला हजार बोटे असावीत' असे भालचंद्र नेमाडे म्हणतात ते खरेच आहे. शोधायला गेले की आपल्या अवतीभोवती उत्तमोत्तम कार्य करणारे अनेक शिक्षक नजरेत येऊ लागतात. त्यामुळे अखेरचा लेख लिहितानाही आपण तो शिक्षकांविषयीच लिहावा असे मनात आले आणि त्या शिक्षकाचा शोधही मला माझ्या जवळच लागला.

– डॉ. कैलास दौंड

चपराक प्रकाशन www.chaprak.com
संपर्क : ७०५७२९२०९२
info@chaprak.com

प्रति,



सोमवार, दि. १८ ते २४ मे २०२६

साप्ताहिक चपराक www.chaprak.com

RNI No. MAHMAR/2011/35979

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा

संपर्क : ७०५७२९२०९२

# विविध दर्जेदार कार्यक्रमांनी बारामती पुस्तक जत्रा संपन्न

**बारामती :** येथील विवेकानंद सभागृहात सामाजिक विकास प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले पुस्तक जत्रेत ९ मे ११ मे दरम्यान अनेक साहित्यिक कार्यक्रम पार पडले. 'चपराक'च्या पुस्तकांचे प्रदर्शन, पुस्तक प्रकाशन, मुलाखत, नाट्यवाचन कार्यशाळा, सुलेखन कार्यशाळा, व्याख्यान, कवी संमेलन, पुरस्कार सोहळा अशा भरगच्च कार्यक्रमांना बारामतीकरांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. रवींद्र टकले यांनी दिली.

या जत्रेचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक आणि संशोधक संजय सोनवणी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'चपराक'चे प्रकाशक आणि संपादक घनश्याम पाटील, माळेगाव कारखान्याचे संचालक नितीन शेंडे, वनिता बनकर, मंगल बोराவके, रवींद्र टकले, प्रा. नलिनी कोकाटे, कवी सदानंद कदंदीकर, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष बापूसाहेब लोखंडे, खजिनदार नवनाथ वळकुंदे, सूर्यकांत भालेराव, रवींद्र बनकर, शंकरराव भुजबळ आदी उपस्थित होते. बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव यांनी सदिच्छा भेट दिली.

पहिल्या दिवशी रसिका तुळजापूरकर आणि अक्षय उपळेकर यांनी वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास यादृष्टिने विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली. यातून नाटक मुलांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. श्रीराम मोहिते यांनी सुलेखन कार्यशाळेद्वारे मुलांना 'लिहावे कसे?' याचे यथायोग्य मार्गदर्शन केले.




**बारामती पुस्तक जत्रेच्या निमित्ताने 'चपराक प्रकाशन'ने सावित्रीबाई फुले यांचा 'काव्यफुले' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. १८५४ साली प्रकाशित झालेल्या या संग्रहाचे पुनर्मुद्रण 'चपराक'ने केले. या संग्रहाचे प्रकाशन करताना डावीकडून प्रा. विजय केसकर, शशांकजी मोहिते, सुप्रसिद्ध साहित्यिक संजय सोनवणी, 'चपराक'चे संपादक घनश्याम पाटील आणि आयोजक रवींद्र टकले.**

संजय सोनवणी यांची घनश्याम पाटील यांनी धडाकेबाज मुलाखत घेतली. त्यात धर्म, समाज, लेखन प्रेरणा, व्यावसायिक आयुष्य, लोकशाहीपुढील आव्हाने, उद्याच्या भारताच्या संकल्पना, आरक्षण, इतिहास, संशोधन, काही सुख-दुःखाचे प्रसंग अशा सर्वस्पर्शी विषयांना त्यांनी स्पर्श केला. याच कार्यक्रमात 'लाडोबा प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या डॉ. संजय जगताप लिखित कथा राष्ट्रीय मूल्यांच्या या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

जगताप यांनी संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, सौजन्यशीलता, श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरुष समानता, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांची ओळख त्यांच्या पुस्तकाद्वारे करून दिली आहे.

हेमचंद्र शिंदे आणि डॉ. हर्षदा शिंदे यांनी अनुक्रमे 'दहावी-बारावीनंतर पुढे काय?' आणि 'वैद्यकीय शिक्षण आणि प्रवेश प्रक्रिया' या विषयावर मार्गदर्शन केले. 'चपराक'चे संपादक आणि प्रकाशक घनश्याम पाटील आणि ॲड. राहुल मखरे यांना उद्योजक राजेंद्र पवार, विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांच्या हस्ते 'समाजभूषण' पुरस्कार देण्यात आला. प्रशांत केंदळे, नितीन चंदनशिवे, हनुमंत चांदगुडे आणि दिनेश आदलिंग यांच्या कवितांची बहारदार मैफिल संपन्न झाली. अनेक विषयांवरील उत्तमोत्तम कवितांचे सादरीकरण आणि सोबत खुमासदार निवेदन यामुळे हा कार्यक्रम चांगलाच रंगला. राज्य अभ्यासक्रम पुनर्रचना समितीचे सदस्य आणि लेखक संदीप वाकचौरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'मार्कांच्या मागे लागताना गुणांचा विसर पडू देऊ नका,' असे सांगत त्यांनी मुलांना अनेक प्रेरणादायी कथा सांगितल्या.

समारोपाच्या कार्यक्रमात संगमनेर येथील ज्येष्ठ नाट्यसमीक्षक आणि लेखक डॉ. सोमनाथ मुटकुळे यांनी 'पुन्हा क्रांतिज्योती' हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर केला. सावित्रीबाई आजच्या परिस्थितीवर जे भाष्य करतात, त्याची चित्रदर्शी चुणूक त्यांनी दाखवली. या प्रयोगाने ही जत्रा एका वेगळ्याच उंचीवर गेली. सामाजिक भान देणारे त्यांचे संवाद अतिशय प्रेरणादायी आणि रोमांचकारी होते.

◀◀ पान १ वरून

# उतरंड अटळ

त्यांना त्यांच्या निर्णयाचा पश्चाताप होईल. पंतप्रधानांनी नुकतेच जे आवाहन केले त्याला सामान्य माणसांकडून काही प्रतिसाद मिळाला का? अनेक नेत्यांच्या गाड्यांचे ताफे सुसाट पळताना दिसतात. आशिष शेलारांना दुचाकीवर घेऊन देवेंद्र फडणवीस विधी मंडळात आले. त्यावेळी शेलार उपहासाने काय म्हणाले...? 'काही दिवसांनी सगळ्या गाड्या बाजूला ठेवून आमच्या सिक्युरिटीला पण आम्हाला डोक्यावर उचलून आणावे लागेल...' काही मोदी भक्तांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा पर्याय निवडला. तास न तास वाट पाहूनही गाड्या येत नसल्याने आणि आलेल्या गाड्या नरकापेक्षा बत्तर असल्याने त्यांनीच त्या व्यवस्थेवर चित्रफिती करून शासनाची लक्तरे काढली.

एकंदरीत काय नरेंद्र मोदी म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू नाहीत, इंदिरा गांधी नाहीत, लालबहादूर शास्त्री नाहीत की पंडित अटलबिहारी वाजपेयी देखील नाहीत. 'ज्या दिवशी नको वाटेल त्या दिवशी झोला उठा के हिमालय चला जाऊंगा' असेच ते सांगतात. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीतच धार्मिक अस्मिता टोकदार झाल्यात. जातीय संघर्ष विकोपाला गेलेत. ज्या प्रवृत्तींच्या विरूद्ध भाजपाच्या लोकांनी आयुष्यभर संघर्ष केला ते सर्व आज भाजपमध्ये येऊन पवित्र झालेत. निष्ठावान कार्यकर्त्यांना पक्षात कसलीच किंमत राहिली नाही. 'धीरूभाई का सपना, सबका माल अपना' या प्रमाणे जे जे लुबाडता येईल ते ते लुबाडण्याचे, ओरबडण्याचे सत्र सुरू आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेसारखी छोटी संस्था असेल किंवा पश्चिम बंगालसारखे राज्य असेल, मतदारयाद्यात घोळ केले, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना हाताशी धरले की जे हवे ते मिळवता येते, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

दुर्गम भागात रस्ते, उड्डाणपूल, महामार्ग अशी प्रगती दिसतेय खरी! त्यामुळे दळववळणाच्या दृष्टिने देश जोडला गेलाय पण याच रस्त्यावरून कोविडच्या काळात शेकडो किलोमिटर चालत जाणारे देशबांधव आपण बघितले. शिक्षण व्यवस्था कोलमडलीय. आरोग्य व्यवस्था तिरडीवर ताणलीय. गुन्हेगारीने कळस गाठलाय. कधीचेही वृत्तपत्र उघडा तुम्हाला या संदर्भातल्याच बातम्या दिसतील.

**पथ का अंतिम लक्ष नही है,**
**सिंहासन चढते जाना**
**सब समाज को लिए साथ में,**
**आगे है बढते जाना**

असं एक अत्यंत प्रेरणादायी संघ गीत आहे. या लोकांना सध्या संघ विचारधारेचेही वावडे दिसतेय. एकीकडे संघाचा सातत्याने 'मातृसंस्था' म्हणून उल्लेख होत असताना दुसरीकडे भाजपवाल्यांनाच संघ संपवायचा आहे की काय, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही. सेवा, त्याग, समर्पण अशा मूल्यांशी फारकत घेतल्याप्रमाणे भाजपच्या नेत्यांचे वागणे आहे. ज्या मूल्यांचे संवर्धन अपेक्षित होते ते पायदळी तुडवण्यात येत आहेत. स्वच्छ चारित्र्य, निष्कलंक व्यक्तिमत्त्व, प्रामाणिक, राष्ट्रप्रेमी नेतृत्व हे सगळे इतिहासजमा होत आहे. काहीही करून सत्ता मिळवायची आणि जेवढी लूट करता येईल तेवढी करायची इतकेच धोरण या 'पार्टी विथ डिफरन्स'कडून दिसतेय.

असे म्हणतात की कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष सर्वोच्च स्थानी गेला की त्याची पुन्हा घसरण सुरू होते. एखादा डोंगर सर करण्याचे आव्हान आपल्यापुढे असते. मोठ्या कष्टाने तो डोंगर चढला की काही भाग सपाट लागतो पण पुन्हा उतरंड अटळ असते. या सपाट भागावर असताना तुम्हाला आनंद मिळतो पण त्यावेळी मस्ती केली तर भुईसपाट व्हायला वेळ लागत नाही. देशातील बहुतेक राज्याची सत्ता हस्तगत केल्यानंतर, अनेक जुन्या नेत्यांना संपवल्यानंतर आपण अमृताचा प्याला घेऊन जन्माला आलोय, असा कुणाचा समज झाला असेल तर तो खरा नाही. जो सामान्य माणूस एखाद्याला डोक्यावर उचलून घेतो तोच अती झाल्यावर त्याला पायदळी तुडवतो हा या मातीचा गुण आहे. खूप कमी काळात स्वतःची दुसरी काँग्रेस करून घेणाऱ्यांना याचा विसर पडू नये इतकेच!

## लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा. प्रवास वर्णन, वाचलेल्या आणि भावलेल्या पुस्तकांचे परिचय, आवडलेली व्यक्तिचित्रणे आदींचे स्वागत. सोबत काही पूरक छायाचित्रे, चित्रे असतील तर तीही पाठवा. ती ज्यांच्याकडून घेतली आहेत त्यांची नावेही कळवा. निवडक साहित्यास 'चपराक'मधून प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकूर युनिकोडमध्ये खालील नंबर किंवा ई-मेलवर पाठवा.

**भ्रमणध्वनी**

७०५७२९२०९२/८७६७९४१८५०

ई मेल : info@chaprak.com